# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२९/०९/२०१६

**१) ईमारत बांधकामाच्या लोखंडी तरापेंची चोरी . :—**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी १५.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी सुधीर शामराव लेंडे वय ३४ वर्ष रा. राजेदहेगाव हा विवेकानंद कॉलोनी पेट्रोल पंप ठाणा येथील ईमारतीच्या बांधकामासाठी ठेकेदारीचे ठेवलेले लोखंडी साहीत्य तरापे ९७ नग एकुण कि. २०,३७०/—रू. चे कोणीतरी २ अनोळखी आरोपीतांनी संगनमत करून चार चाकी गाडी आणुन गाडी मध्ये टाकुण चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) शेतातील थ्रिफेस वायरची चोरी . :—**

दिनांक ०६+०७/०९/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी सुहास सदाशिव हातझोडे वय २३ वर्ष, रा. घानोळ यांचे शेतशिवारातील वडीलोपार्जीत मालकीच्या शेतात विद्युत मिटरमधुन बोरवेलला जोडलेले थ्रिफेस काळया रंगाचे ६ एमएमचे वायर १५० मिटर कि. ३,३००/—रु. चे माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन खुल्या जागेतील वायर तोडुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) शिक्षण संस्थेमधुन कम्पुटर साहीत्याची चोरी :—**

दिनांक २७/०९/२०१६ रोजी १२.००ते २८/०९/२०१६ चे १६.०० वा. दर. यातील जयलक्ष्मी शिक्षण संस्थेच्या कार्यालय डॉ. कॉलोनी तकीया वार्ड भंडारा चे कार्यालयाच्या दाराचा कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोराने कॅम्पअप कंपनीचा कम्पुटर, मॉनीटर, सिपीयु, कॅम्टॅक्स कंपनीचा प्रिंटर, एचपी कंपनीचा युपीएस १ मॅक्रोमॅक्स कंपनीचा व १ इनटेक्स कंपनीचा किबोर्ड एकुण कि. १०,०००/—रु. चा माल कोणीतरी चोरुन नेल्याने फिर्यादी भगवान सोनबाजी मस्के वय ५६ वर्ष रा. भंडारा यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) बोलेरो वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकीचा मृत्यु व चार जखमी . :—**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी ११.४५ वा. दर. यातील आरोपीची वाहन बेलेरो पिकअप गाडीच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन रोडने जाणा—या शाळेतील मुलांना व महीलेला धडक मारुन त्यात मृतक कु. स्वाती केवळराम मैदरकर वय १७ वर्ष हीचे मरणास आणि १) आकाश भगवान देशमुख वय १७ वर्ष २) अक्षय विनायक तुळसकर वय १७ वर्ष ३) नितीन सुभाष देशमुख वय १७ वर्ष हया तिन मुलांना व एक महीलेस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सतिश दौलत मैदरकर वय २९ वर्ष, रा. खैरी तेलोता यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. नेवारे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २८/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, सिहोरा, पवनी, व साकोली येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४१ लिटर हातभट्टी दारु कि. २,३६०/–रु. व १ लिटर ४४० मिली लिटर देशी दारु कि. ४००/–रु. तसेच जुगारातुन कि. २३६ असा एकुण कि. २,९९६ /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९०१११७०६००

२९/९/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.